# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-6465145/46 **फॅक्स क्र.** 0712-2561663

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in


**अतितात्काळ**

क्र. तशिस/प्राकाना/शैवि-3/MAHADBT/2019/ 824

दिनांक:- 28 FEB 2019

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर.

विषय – विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी DBT Portal वर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबीत कार्यवाही त्वरीत दिनांक 28/02/2019 पर्यंत पुर्ण करण्याबाबत.

संदर्भ – तंत्रशिक्षण संचालनालय म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 18/तंशिस/EBC/DBT/2019/ 87, दिनांक 20/02/2019

आपले सरकार DBT Portal वर तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या **DrPunjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna(DTE)/ Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna(EBC)/ Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional courses(DTE)** योजनेचे शै.व. 2018-19 वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील संस्थास्तरावरील कार्यवाही प्रलंबीत असल्याबाबत संदर्भांकीत पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

करीता आपणास सुचित करण्यात येत आहे की, आपल्या संस्थेच्या Login मध्ये DBT Poral वर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावर संस्थास्तरावर कोणतीही कार्यवाही प्रलंबीत राहिलेली असल्यास दिनांक 28/02/2019 पर्यंत सदरहु कार्यवाही पुर्ण करण्यात यावी तसेच कोणताही पात्र विद्यार्थी उपरोक्त योजनांसाठी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता स्वत: संस्था प्राचार्यांनी घ्यावी.

सहपत्र- वरीलप्रमाणे

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत – मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीस मानार्थ सादर.

F:\data bac\my General Letter ISM 06 for deo.doc

F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३ , महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९ , फॅक्स - २२६९०००७

E-mail : desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**ईमेल / रजिस्टर एडी / स्पीड पोस्टद्वारे**

क्रमांक : १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/८७

दिनांक : २० /०२/२०१९

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील प्रलंबित कार्यवाही त्वरित दि.२८/०२/२०१९ पर्यत पूर्ण करण्याबाबत...**

**आपले सरकार डी.बी.टी पोर्टल** ( संकेतस्थळ : **https://mahadbtmahait.gov.in** ) वर तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या खालील योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना ( भाग-१ वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून )

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील आपले सरकार डी.बी.टी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील संस्था स्तरावरील कार्यवाही प्रलंबित असल्याबाबत निदर्शनास येत आहे. तरी आपल्या विभागा अखत्यारित असलेल्या संस्थांमध्ये डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जावरील संस्था स्तरावरील कोणतीही कार्यवाही प्रलंबित राहिलेली असेल तर ती त्वरित पूर्ण करुन घेण्यासाठी संबंधित संस्थांना नोटीस बजावून सदर कार्यवाही **दि.२८/०२/२०१९** पर्यंत करण्याबाबत निर्देश द्यावेत.

ज्या विद्यार्थ्यांना त्याच्या लॉगीन आयडीमध्ये Redeem Option प्राप्त झालेला आहे ( यादी प्राचार्यांच्या लॉगीन आयडीमध्ये उपलब्ध ) त्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त होण्यासाठी Redeem Option चा वापर करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना Redeem Option चा वापर करणे , तसेच काही विद्यार्थ्यांचे अर्ज ( विद्यार्थी / क्लार्क / प्राचार्य यांच्या लॉगीन आयडीमध्ये ) Sent Back अंतर्गत दिसत आहेत असे अर्ज दि.२८/०२/२०१९ पर्यंत निकाली ( मंजूर / नामंजूर ) काढण्यात यावेत. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी उपरोक्त योजनांसाठी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता स्वत: संस्था प्राचार्यांनी घ्यावी अशा सूचना आपल्या स्तरावर देण्यात याव्यात.

तसेच विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्येही डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या व संस्थेने पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेल्या अर्जावरील कार्यवाही प्रलंबित राहाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.